
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरी

प्रा. सौ. सारिका अशोक पाटील

**गोषवारा -**




एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठी ग्रामीण कादंबरीतील प्रयोगशीलतेच्या पार्श्वभूमीवर काही साहित्यकृतीची दखल घेणे कर्म प्राप्त आहे .इसवी .सन 2000 नंतरच्या ग्रामीण आणि समस्थिती वर्णनाच्या कादंबरीचा विचार करताना बाबाराव मुसळे यांची 'वारूळ 'प्रतिमा इंगोले यांची 'पार्ट टाईम 'आशा बगे यांची 'भूमी 'रवींद्र शोभणे यांची' पांढर' नवनीत देशमुख यांची 'अंगणवाडी' अशोक पवारांची दर 'कोस 'दर 'मुक्काम' सदानंद देशमुख यांची 'चारीमेरा 'या कादंबऱ्याचा समावेश उल्लेखनीय कादंबऱ्यांमध्येकरता येईल.

रमेश इंगळे उत्रादकर यांची 'निशाणी डावा अंगठा'व 'सर्व प्रश्न अनिवार्य' श्रीकांत बोजेवार यांची 'पावणेदोन'पायांचा 'माणूस 'दिनकर दाभाडे यांची 'व्हाया सावरगाव खुर्द' सुशील धसकटे यांची 'जोहार 'अशा काही कादंबऱ्यांची पारंपारिक आशय आणि अविष्कार मूल्यांना समांतर अशा नवनव्या पायवाटेवरून वाटचाल करीत मराठी कादंबरीच्या कक्षा रुंदावत गेल्या .

**प्रस्तावना -**

एकविसाव्या शतकात जागतिकीकरण, उदारीकरण आणि आधुनिकीकरणावर जोर दिला गेला साहित्य भाषा संस्कृती अशा विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तने झाली. नव्वद नंतर आणि एकविसाव्या शतकांमधील मराठी ग्रामीण कादंबरी जागतिक स्तरावरील कादंबरीचे दर्जापर्यंत पोहोचू शकलेली नाही तिच्यामध्ये प्रयोग झाले नाहीत ,अशातला भाग नाही परंतु जो दर्जा मिळाल्यास हवा होता.तो मात्र तिला अदयापपर्यंत प्राप्त करता आलेला नाही.

प्रादेशिक कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी यांच्यातील सीमारेषा धुसर असल्या तरी दोन्ही प्रकार वेगळे आहेत प्रादेशिक कादंबरीने काही वैशिष्ट्यपूर्ण अशा वेगळ्या अंगाने स्वतःचे अस्तित्व प्रखर केले. तरी पण पुष्कळदा अनेक प्रादेशिक कादंबऱ्याची गणना ग्रामीण कादंबऱ्यांमध्येकेली गेल्याचे जाणवते.

नव्वद नंतर आणि पुढे एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठी ग्रामीण कादंबरीतील प्रयोगशीलतेच्या पार्श्वभूमीवर काही साहित्यकृतीची दखल घेणे क्रमप्रात आहे.

**विषय विवेचन -**

नव्वद नंतर आणि एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी ग्रामीण जीवनात खूप बदल झाले आहेत .ग्रामीण जीवनातील संघर्ष आधिक कठीण आणि जीवघेणा झाल्याचे जाणवते .पण या काळात किंवा आजच्या घडीला विलास अंभोरे, कैलास दौंड ,महेश मोरे, अनुराधा गुरव, वैशाली कोल्हे, उज्वला शिंदे, मेघा पाटील, अनुराधा वैद्य, संपत जाधव अशी काही नवीन पिढयातील मंडळी काही जुन्या पारंपारिक अंगाने तर काही नव्या आशयाच्या अंगाने कादंबरी क्षेत्रात पुढे आल्याची आपणास पहावयास मिळते.

1991 मधील विश्वास पाटलांची 'झाडाझडती,' 1992 मधील रवींद्र शोभणे यांची 'कोंडी' 1994 मधील दिनकर दाभाडे यांची 'बिलामत' १९९५ मधील बाबा भांड यांची 'दशक्रिया '1995 मधील बाबाराव मुसळे यांची पखाल  1998 मधील सदानंद देशमुख यांची 'तहान' 1999 मध्ये प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' 2000 मधील सदानंद देशमुख यांची 'बारोमास' अशा या उल्लेखनीय कादंबऱ्या मधून समकालीन कृषी व्यवस्थेचा वेध दिसून येतो. त्याचप्रमाणे शोषणाविरुद्ध बंडखोरी आणि स्वाभिमानी नाईक नाईकांची पेरणी दिसते. समाजात नवी मूल्य रुजवण्याचा प्रयत्नही या कादंबऱ्यातून झाल्याचे आपल्याला दिसते.1999 मधील रमेश अंधारे यांची 'पागोरा' 1997 मध्ये राजन गवस यांची 'तणकट' 2001 मध्ये किशोर सानप यांची 'हारास' या कादंबऱ्या भाषिक बोलीच्या प्रयोगामुळे उल्लेखनीय ठरतात.

2000 नंतरच्या अर्थात एकविसाव्या शतकातील ग्रामीण आणि समस्थिती वर्णनाच्या कादंबरीचा विचार करताना बाबाराव मुसळे यांची 2005 मधील 'वारूळ' 2002 मध्ये प्रतिमा इंगोले यांची 'पार्टटाइम' 2004 मधील आशा बगे 'भूमी' 2008 मध्ये रवींद्र शोभणे यांची 'पांढर' 2009 मधील नवनीत देशमुख यांची 'अंगणवाडी' 2010 मधील अशोक पवारांची दर'कोस' दर'मुक्काम' 2016 मध्ये सदानंद देशमुख यांची 'चारीमेरा' या कादंबऱ्याचा समावेश उल्लेखनीय कांदब-यामध्ये करता येईल.

तसेच 2005 मध्ये रमेश इंगळे उत्रादकर यांची 'निशाणी डावाअंगठा' तसेच 2011 मधील 'सर्व प्रश्न 'अनिवार्य' 2007 मधील गणेश आवटे यांची 'भिरुड' त्यानंतर 2010 मधील भालचंद्र नेमाडे यांची 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' 2018 मधील नवनाथ गोरे यांची 'फेसाटी' 2019 मधील  रंगनाथ पठारे यांची 'सातपाटील कुलवृत्तांत याकादंबरीने मराठी कादंबरीचे कक्षा रुंदावल्या.

## एकविसाव्या शतकातील निवडक कादंब-याची वैशिष्ट्ये-

### नवनाथ गोरे यांची 'फेसाटी '-

2018 मधील' फेसाटी' या कादंबरीत पशुपालक ,अल्पभूधारक शेती समूहातील तरुणा च्या संघर्षाची कथा साकारली आहे .नाथा गोरे या तरुणाच्या महाविद्यालयीन काळापर्यंतचा जीवनप्रवास या कादंबरीतून सांगितला आहे. ही जीवन कथा केवळ नकोशा शिक्षण व्यवस्थित पुरती सीमित नाही तर यासह अनेक कंगोरे आहेत. 'स्व' च्या शिक्षण प्रवासाबरोबरच कुटुंब आणि समाजातल्या अनेक महापेचाना ती साकार करते. दारिद्र्याचा शाप भाळी ल्यालेल्या आणि कर्जाच्या निरंतर सावटाखाली जखडलेल्या समाजाचे चित्र लेखकाने साकारले आहे .खेड्यातील व्यक्ती समूहाची ही व्याधी कथा आहे .हा समाज पट सुबरांच्याआख्यान रूपात गुंफला आहे .गोष्टी वेल्हाळ आत्मपरता आणि वैशिष्ट्यपूर्ण संवाद व 'जत' परिसर बोलीची सहजता या कथनास आहे .'जात तू माझ्या मागला, जातो माझ्या गावाला ,'सांग तू म्या जनाला, या दृष्टीने ही कथा सांगितली आहे

### अविनाश कोल्हे यांची पंगतीतल पान-

2020 सालीप्रकाशित झालेली 'मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस' पुरस्कृत अविनाश कोल्हे यांची 'पंगततलं पान 'ही कादंबरी विविधांगी गुणांनी नटलेली आहे. कादंबरीत प्रतिबिंबित झालेले व कादंबरीच्या केंद्रस्थानी असणारे गावकी व भावकी यांचे स्वरूप लेखकाने जाणलेली मानवी नातेसंबंधातील सूक्ष्मता कौटुंबिक नात्यातील सत्ता संबंधाची वीण आणि तिला मिळालेली वेगवेगळी वळणे कादंबरीला समृद्ध असे परिमाण प्राप्त करून देते .गुलाब धांडे पाटील यानायकानेअनुभवलेले अकॅडमिक जग आणि व्यवहारिक जग यातील प्रचंड दरी तसेच जीवनाला सामोरे जाताना येणारे वेगवेगळे लहान मोठे अनुभव याचे रोचक  परिणामकारक चित्रण आपणास दिसून येते .

अकॅडमिक पर्यावरणातले मोकळेपण आणि ग्रामीण जीवनातले कौटुंबिक ताण जातीपातीचे सामाजिक वास्तव लग्नाकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन स्त्री-पुरुष नात्यातील गुंतागुंतइत्यादींची उत्कंठावर्धक मांडणी कादंबरीची आवाहकता वाढवते. सुस्पष्ट व्यक्ती दर्शन आणि प्रसंगाची नाट्य पूर्ण रचना कादंबरीच्या कलात्मकतेतभर घालते. कादंबरीतून व्यक्त होणारी जीवन विषयक समज ही प्रगल्भ आहे .

### अशोक पवार यांची इळणमाळ-

2008 साली प्रकाशित झालेली अशोक पवार यांची 'इळणमाळ 'ही आत्मचरित्रात्मक कादंबरी' बेलदार'या भटक्या जमातीचे चित्रण 'मारोती 'या व्यक्ती चित्राच्या माध्यमातून मांडली आहे .'मारोती'स्वतः आपल्या जीवनाची कथा सांगत आहे. म्हणजे नेहमी भटकणारे लोक कधीही न थकणारी दोन पायाची पाऊलवाट ..!

या कादंबरीच्या माध्यमातून जातपंचायत, गुन्हेगारी, व्यसनाधीनता,लैंगिक शोषण, शैक्षणिक उदासीनता, रूढीपरंपरा ,अंधश्रद्धा इत्यादी गोष्टींवर प्रकाश टाकलेला आहे.

या कादंबरीत जेव्हा मारोतीकडे लोक जातपंचायतीला पुढारी हो म्हणून येतात .त्यावेळी शिकला सवरलेला मारोती स्पष्ट नकार देतो. आणि म्हणतो ,जात पंचायतीचा अदिम अव्यवस्थेत असणारा कायदा आजही एकविसाव्या शतकात माणसाचं जगणं नाहीसं करतो. मग लोकशाही स्वातंत्र्यसमता विश्वबंधुताम्हणजे काय ?हा प्रश्न तो समाज व्यवस्थेला विचारतो.

या कादंबरीच्या माध्यमातून एक गोष्ट लक्षात येते माणूस म्हणून जगण्यासाठी परंपरेला छेद देऊन शिकण्याची कास धरली पाहिजे .'बळी' कादंबरीतील 'आबा' 'जेव्हा मी जात चोरली होती'मधला 'जय''पडझड 'मधला 'तुक्या' आणि इळण माळ मधला 'मारोती'भविष्याची स्वप्ने रंगवत असतात. पण त्यांना नोकरी मिळत नाही. त्यामुळे हवालदिल होतात त्यांचा समाज व्यवस्थेविरुद्ध लढा अखंड चालू आहे .

## बळीचा राजन गवस यांची कादंबरी -

2012 मधील प्रकाशित झालेली राजन गवस यांची ब-बळीचा या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने हजारो शेतकऱ्यांचे जीवन व्यथा, घालमेल, मरणप्राई जगणं यांचा जिता जगता अनुभव शब्दबद्ध केला आहे .छोट्या छोट्या गोष्टीसाठी काय आटापिटा करावा लागतो. तो शेतकरीच जाणे लहरी हवामान सावकारी पाश कमी कमी होत चाललेली जमीन आणि जगण्याची कसरत यातून व्यक्त होते .

कोल्हापुरी भागातील भाषा हे या कादंबरीचे बलस्थान. असंख्य कथा, उपकथा ,नोंदी ,चित्रपट कथा, ज्योतीरावांना पत्रे असे सर्व काही या कादंबरीत आहे. लेखक यात आपल्याला गुंतवून ठेवतो. एकाच वेळे हजारो गुंते सोडवायचा हा प्रयत्न आहे .पण हा गुंता काही सुटत नाही उलट त्यातच आपण अडकून जातो यातून सुटका नाहीच.

## अन्य उल्लेखनीय कादंबब-या -

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मराठी ग्रामीण कादंबरीने नवनवीन प्रयोग केलेले आहेत .किती तरी कादंबऱ्या उल्लेख करण्याजोग्या आहेत. 2005 मध्ये दिलीप भावसार यांची 'जिताड '2011 मधील आनंद लिंगकर यांची 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट '2013 मधील अशोक पवार यांची 'तसव्या' अशा काही कादंबऱ्यांनीवेगवेगळे प्रयोग मराठी ग्रामीण विश्वाला सादर केले आहेत .

## समारोपीय निष्कर्ष -

एकविसाव्या शतकातील ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना जाणवते की नवनवीन विषय आशय नव्या दमाच्या कादंबरीकारांनी हाताळले आहेत .पारंपारिक चौकटीतून बाहेर येत ग्रामीण जीवन वर्णनात नवनवीन भाषिक रूपे ही पुढे आलेली आहेत. कल्पनाची झेप अधिक व्यापक होत असताना अद्भुता कडे ही लेखणी वळल्याचे क्वचित जाणवते. नवनव्या भीषण आशा समस्यांना सामोरे जाण्याच्या नवनव्या पद्धतीने ग्रामीण कादंबरीने काळजाला भिडेल असे रेखाटलेत्र आहे. काही वेळा अधिक पाल्हाळ, अनावश्यक विस्तार ही दिसून येतो .मात्र ही एकविसाव्या शतकाची सुरुवात असल्याने पुढे ग्रामीण कादंबरी आणखी प्रकल्प होईल.

## संदर्भ -

1.सानप .डॉ.किशोर 'नवोदत्तर मराठी ग्रामीण कादंबरी :अविष्कार तंत्रे आणि शैली ',नवोदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी , संपा.डॉ.गजानन जाधव. अनघादित्य प्रकाशन ,परतवाडा प्रथम आवृत्ती, 15 ऑक्टोबर 2021 पृष्ठ 65

2. यादव ,आनंद 'ग्रामीणता'' साहित्य आणि वास्तव 'मेहता पब्लिशिंग हाऊस ,पुणे ,1981 पृष्ठ 53

3. मोरे नंदकुमार समाज भाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी पद्मगंधा प्रकाशन, पुणे .प्रथम आवृत्ती 2012 पृष्ठ ते 83

4. गवस .राजन 2012 ब-बळीचा मुंबईपॉप्युलर प्रकाशन.